डॉ. नितीन मोरे

# मुक्ताफळांची माळा



# मुक्ताफळांचा मळा

## (अर्थात चार डझन विडंबन गीते)

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मुक्ताफळांचा मळा

लेखकः- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ३० ऑक्टोबर २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चौपन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# मुक्ताफळांचा मळा

(अर्थात चार डझन विडंबन गीते)

Important

**'मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.'**

Important

**'मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.'**

## मुक्ताफळांचा मळा

**अनुक्रम**


१. दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे

२. फिरत्या चाकांवरती देशी

३. नच सुंदरी करू कोपा

४. मेंदीच्या पानावर

५. आज गोकुळात रंग खेळतो हरी

६. सखी मंद झाल्या तारका

७ आकाशी झेप घे रे पाखरा

८ ओठातल्या ओठात वेडे

९. धुंदीत राहू मस्तीत गाऊ

१० पदरावरती जरतारीचा मोर नाचता हवा

११ सखी शेजारणी तू हसत रहा

१२ सांग तू माझा होशील का?

१३ जिंकू किंवा मरू

१४. एक धागा सुखाचा

१५ काय बाई सांगू कशी गं सांगू

१६ देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा

१७ रेशमाच्या रेघांनी

१८ मारू बेडूक उडी

१९ ससा तो कसा

२० बुगडी माझी सांडली गं

२१ डाव मांडून भांडून मोडू नको

२२ तोच चंद्रमा नभात

२३ येऊ कशी कशी मी नांदायला

२४. जाईन विचारीत रानफुला

२५. आला आला पाऊस आला

२६. एका तळ्यात होती बदके पिले सुरेख

२७. आली बघ गाई गाई

२८. टाळ बोले चिपळीला

२९. धुंदीत गंधित होऊनी सजणा

३०. नको आरती की नको पुष्पमाला

३१ कौसल्येचा राम बाई

३२. खुलविते मेंदी माझा रंग गोरापान

३३. काटा रूते कुणाला

३४. धुंद आज डोळे हवा धुंद झाली

३५. जांभूळ पिकल्या झाडाखाली

३६. गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय?

३७. केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर

३८. फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार

३९. केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा

४०. आज कुणीतरी यावे..

४१. शूर आम्ही सरदार आम्हाला

४२. जनता जेथे राज्य करी

४३. तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं

४४. कधी दूर दूर कधी तू समोर..

४५. असावा सुंदर चॉकलेटचा बंगला

४६. शेपटीवाल्या प्राण्यांची पूर्वी भरली सभा

४७. तुला पाहते रे

४८. कर हा करि धरिला शुभांगी

अर्पणपत्रिका

माझा कधी अँग्री न होणारा रत्नँग्रीकर मित्र, मानसोपचार तज्ञ आणि नकलाकार, नट, गायक मित्र डॉ. कृष्णा पेवेकर यास हा मळा सुहास्य सादर..

# मुक्ताफळांचा मळा

(अर्थात चार डझन विडंबन गीते)

प्रस्तावना १.

विडंबन काव्य प्रकार हाताळण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न. मराठी चित्रपट गीते, भावगीते, नाट्यगीते, बालगीते इत्यादींचे आपल्या जीवनात एक मोठेच स्थान आहे. कित्येकांनी ही गीते शब्दच नव्हे तर चाली, संगीतासह मुखोद्गत असतील. गाण्याची पहिली ओळ ऐकताच ही अवीट गोडीची गाणी गुणगुणली जातात. या गाण्यांच्या शब्दकळेवर आधारित, मूळ कवी आणि संगीतकारांची ची मनापासून क्षमा मागत नवीन विनोदी ढंगाची (कधी उपरोधिक, कधी नुसतीच शेरेबाजी तर कधी फारसा खोल अर्थ नसणारी) गाणी लिहिण्याचा हा प्रयत्न वाचकांना पसंत पडावा ही अपेक्षा. वाचताना मूळ चालीवर वाचल्याने त्यांची (असलेली, नसलेली) गंमत वाढू शकावी.

डॉ. नितीन मोरे

प्रास्ताविक २.

मुक्ताफळांच्या मळ्यात जाण्यापूर्वी..
मूळ:
दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा
https://youtu.be/zD8Jya_QgME?feature=shared
विडंबना विडंबना, न माजवू गाण्यांचे अवडंबरा
विडंबन करू जरा हो, गाणी जुनीनवी अशी स्मरा

हे गानामृत भवदीयमारक
हास्य कारक, भवभयकारक
हास्यसुखाचा मोद लुटाया, हा संग्रह अपुल्या हाती धरा

कुठे न जावे बाहेर फुकाचे
हास्यवदन मिळे गॅरंटीचे
कवच लाभता हास्यरसाचे, टेन्शन सगळे दूर करा

हा शब्दशब्दांचा खेळच करता
लय तालावर गाऊन बघता
अन हा विडंबन संग्रह गाता, भान वेळेचे न राहो जरा

डॉ. नितीन मोरे

१

दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे..

**https://youtu.be/DdcSetXFf-w?feature=shared**

Important

**'मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.'**

श्री.'ब' म्हणजे बंडखोर. त्यांना पक्षात अडकवून ठेवायचे म्हणजे सोपे नाही. पण श्री.'अ' यांनी  दामाजींद्वारे हे काम करून घेतलेच..

'अ' आणि ब यांचे हे द्वंद्व गीत!



अ:

दिल्या घेतल्या थैल्यांची शपथ तुला आहे

ब:

मनातल्या मंत्रिपदाची शपथ तुला आहे

अ:

टेबलाच्या खालूनिया बंद दालनात

मोकळा सोडिला हात गेला तो खिशात

त्या सगळ्या गांधीबाबांची शपथ तुला आहे..

ब:

असला हा डाव रचिला, पक्ष बदलाचा

मी जर सोडूनिया गेलो पळत्या भुईचा

या सगळ्या पक्ष उड्यांची शपथ तुला आहे..

अ:

उडउडत्या अफवा होत्या रोज ऐकिवात

त्याला न उपायही कसला, कसली न बात

त्या सगळ्या फेक न्यूजांची शपथ तुला आहे

ब:

हळू हळू का करता ना विस्तार तो जंगी

नका समजू मजला कुणी असा अतरंगी

त्या सगळ्या कॅबिनेटपदांची शपथ तुला आहे



२

**फिरत्या चाकांवरती देशी**

https://youtu.be/EeNd0JJbM-U?feature=shared

Important

'मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.'

**विठोबा चांभारच्या दुकानी..**

तुटल्या चपलांना ही देशी चुकांचा आधार
विठोबा तू मोठा चांभार

खिळे चुका अन काय पसारा
शिवण्या दाभण अन तो दोरा
बसशी पायालगती न तोरा
तुटक्या चपलांना ही देशी तू असला आकार

तुझ्या दुकानी एक बाकडे
चप्पल सोपवूनी अन तुजकडे
कुणी बसतसे त्यावरी वाकडे
अनवाणी पायाने निरूपायी पाही कसा धावे संसार

पट्टी जोडीशी खिळे ठोकशी
झिजल्या तळास सोल जोडशी
कारागीरी करी बूट पाॅलिशी
दुरूस्त करूनी अन चालविशी पायतणांचे भंडार

३

**नच सुंदरी करू झोपा..**

https://youtu.be/BCL8IdWXaQw?feature=shared

**ठाणे लोकल पकडून ऑफिसात जाणाऱ्या नोकरदाराची बायकोला विनवणी**

नच सुंदरी काढू झोपा
उठ लवकरी करी कृपा
उशीर मज होई बहुत, दे डबा करी अनुकंपा

गाड्या त्या बहु असती
पण स्टार्टिंग लोकल तीती
इतर कशा फुल्ल असती
त्यां चढण्या नाही जमती
कुणी ते कुठूनी घुसती
दम माझा तो घुसमटती
झटक तो आळस बहुत, कां काढशी इतक्या झोपा

उठूनि लागावे कामाला

कां लेट मार्क हा झाला

हिशेब ठेवि मिनिटाला

कापीत शेट पगाराला

नच देशी तू मज डब्याला

कां रोज मी जावे कँटिनला

बॉस माझा रागीट बहुत, वाजविल असल्या तोफा




४

**मेंदीच्या पानावर..**

https://youtu.be/JFcN0QBx_MQ?feature=shared

माझ्या या कानावर न्यूज अशी पडतेय रं
फेक आहे की खरी, हे कुणा कळतंय रं

खरी असो किंवा खोटी हा बातम्यांचा पसारा रं
सावरतो मिडीया तर यावरतीच डोलारा रं

आजच्या या मिडियाला नाही सोवळं ओवळं रं
मिळाल्या जर जाहिराती सोन्याहून पिवळं रं

५

**आज गोकुळात रंग खेळतो हरी**

https://youtu.be/ikk-Pwe_nw0?feature=shared

**साहेबांची जामिनावर सुटका होते नि कार्यकर्त्यांत आनंदीआनंद होतो..**

आज साह्येब येनार होऊनी बरी
बेलवर सुटती आन येतील घरी

निघंल ना मिर्वणूक कोण रोखतो
इरोधकांनो बोंबला, पानी जोखतो
बघूया आज साह्येबांस कोन टोकतो
जेलमध्ये गावं बेल काय आनंन त्या परी

काय त्या इरोधकांस काय जाहले
जेलमधी धाडल्या विना न सोडले
इनाकारन आरोपांचे डाग डाग लागले
आले परत साह्येब आता सोडती का तरी

या इथे म्हनती कसा भ्रष्टाचार जाहला
म्हनती उगा साह्येबानं पयसा खाल्ला
कोरटानं केली न्हवं सुटका आजला
पयशाबिगर निवडनूक कुनी लढती का तरी

६.

**सखी मंद झाल्या तारका..**

https://youtu.be/slVGSbbodKM?feature=shared

**खाण्यासाठी नखरे करणाऱ्या आपल्या मुलाला भरवणोत्सुक आईचे गाणे..**

कसा असला तू बारका
आता तरी खाशील का?
खाशील का?

ही सवय तुझी आहे जुनी
घे घास चार तू खाऊनी
हा घास अंतिम राहिला
तो खाऊनि घेशील का?

खाण्याची आहे रीत अन
ताटात आहे काही ही
हे सर्व खाणे हाणणारा
पुत्र तू होशील का?

जे जे हवे तुज जेवणी
ते सर्व आहे वाढले
तरी ही हवे काही दुजे
हे नखरे तू सोडशील का?

खादडल्या वाचूनही
कोणी न होई जाडे इथे
ही खीर घे तू पळीभरी

सांग अजूनी खाशील का?

७

**आकाशी झेप घे रे पाखरा..**

https://youtu.be/mYvSHjO9LXA?feature=shared

**इंटरनेटच्या जाळ्यात तरूणच नव्हे तर लहान पोरंही अडकलीत, आपल्या झोपेची 'कुर्बानी' देत..**

थोडीशी झोप घे रे लेकरा
घेई थोडासा ब्रेक जरा

नावाला सोशल ते मिडिया
नसे सोशल ही तर चिडिया
का वेळ तू दवडिशी वाया
न मिळे तर का होशी तू बावरा

तुजभवती सारा पसारा
इंटरनेटीचा तो डोलारा
समजून तो अरे पोरा
हा कुठवर वेड्या जागसी का सारा

हे नेट दिले तंत्राने
वापरशी तू नेटाने
कां पेटशी रे हट्टाने
हा शौक न बरा, वेळीच न का रे सावरा

इकडे कां ज्ञान ते मिळते
तुज ठाऊकी पण ना वळते
उगा पळ पळ वेळ ती सरते
हा मोहच व्यर्थ रे, न का त्या आवरा

येथे वेळेचे भान न उरले
आयुष्य ते तुझे न पुरले
मैदानी खेळ ते खुलले
आभासी जग ते सारे, हे कधीच न विस्मरा

८.

**ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे राहिले..**

https://youtu.be/xHvYif2Sxno?feature=shared

**अर्थातच पक्षफुटीचा धोका टळलाय.. आता सरकार तगेल.. तगेलच!**

राहिले.. - गोटातल्या गोटात सारे एमपी माझे
राहिले .. - भेट झाली श्रेष्ठींची ना, समाधान त्यांचे
जाहले..

काय ते हात देती, म्हणती आम्ही आहोत दासू
खुर्चीच्या जादूतूनी फुटे हे चेहऱ्यावरले गोड हासू
दो पदांच्या आश्वासनांने सरकार माझे
तारले..

कोण तू खुर्चीविना रे, ताबेदारी हुकुमांची
मोडताना बंड झाली, थंंड आग खुमखुम्यांची
काठी अन गाजरे बघूनी, बंड मागे
सारले..

आदेश वरूनी येता कैसे म्हणू आला न येथे
लाळ घोटा रोज अजुनी, प्रगतीची द्वारेच जेथे
लाख आश्वासनांविण ना टिके सरकार माझे..
चांगले

९

**धुंदीत गाऊ मस्तीत राहू..**

https://youtu.be/lkA6AmFG840?feature=shared

Important

**'मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.'**

ऐटीत राहू मिळूनी खाऊ
चालवीत जाऊ सरकार या चला
कल्पना ही नामी
नको गुलामी
चला राज्य करू आज या जरा

विकासाचं काम कुठे अटकलेले
मतदार संघात कुणी कसे अडलेले
घ्या त्याला सांगाती,
करू दादापुती
धरुया सुपंथी बनवू सरकार या चला

सिंचने भिजवावी नको एककल्ली
मते रूजवावी इथे गल्लीगल्ली
निवडून येण्याची
खात्री मनाची
बनून संत्रीमंत्री करूया राज्य या जरा

कुठे येई पहा वरूनी इशारा
इलेक्शन जवळी सगळा पसारा
अशा युद्धकाली
याद मला आली
बेरजेने बनवूया सरकार या चला..

१०

**पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा..**

https://youtu.be/5iz3LC_ksVE?feature=shared

गाडीवरती फिरता फिरता दिवा लालच हवा
द्या ना मला चांगला पोर्टफोलिओ की नवा

नाही ना पहिल्यांदा निवडून विधानसभेवरी
पिंजून काढितो मतदाराचा संघ ही वरचे वरी
अजूनी पाहतो वाट पदाची.. हालत माझी बुरी
नुसत्या माझ्या आमदारीवर मंत्र्याची झूल चढवा

श्रेष्ठिंची आरती ओवाळित हे नाक ही चोंदले
त्यांची करितो भक्ति इतुकी, नाव ही मी गोंदले
लोकप्रतिनिधी साधा म्हणूनी का प्रतिमेत कोंडले
नको शिक्षण, उद्योग वगैरे महसूलात मज नांदवा

लाल दिव्यापरी या पामरास सुख ते कोणते
माझ्यापरीस न दुसरा कोणी, तुम्ही तर जाणते
काय सांगू मी घरी ती बाईल फारच भंडावते
दुष्काळी या आयुष्यात तो येऊ द्या ना गारवा

११

**सखी शेजारणी तू हसत रहा**

https://youtu.be/qCDQU2LJ7F8?feature=shared



सखी डुक्करिणी तू लोळत रहा
कर्दमात मजा करीत रहा

काळे कुळकुळीत केस कोवळे
मुखात तुझ्या जणू चमकती
पोवळे
भर रस्त्यामधी तू असली खेळे
तू उकिरड्यावरती फिरत रहा

सहज तू जाता चिखलामधुनी
चालशी असली गटार शोधुनी
हसशी असली मग दात काढुनी
तू लेप कर्दमी शरीरी लिंपित रहा

त्या कर्दमातच तव पाय रूततसे
चिखलातच तुज पदन्यास सुचतसे
त्या वाचुनि तुज न घास पचतसे
तू नाचत गात अशी पंकात रहा

१२.

**सांग तू माझा होशील का?**

https://youtu.be/XIwyJgojLF0?feature=shared

तिचे लग्न जुळते.. सायकलच्या दुकानात काम करणाऱ्या काडी पैलवानाशी..

ती:

सांग तू जाडा होशील का?

दंड बैठका नि वजने दिनांती
खुराक घे रे असला त्या उपरान्ती
मांस मूठभर चढेल असले काही करशील का?

नसेल माहित तुला सख्या ते
पैलवानी मम स्वप्नी येते
बेटकुळी कधी काढूनि मजला दाविशी का?

ऐक कल्पना सुचली नामी
बघ का येईल तुझिया कामी
पंपामधुनि भरुनी हवा तू असला फुगशिल का?

१३.

**जिंकू किंवा मरू**

https://youtu.be/VCjMclSG744?feature=shared

कित्येक म्युनिसिपालट्यांनी इतस्तत: थुंकण्यावर दंड आकारणे सुरू करून मूलभूत हक्काची गळचेपी सुरू केली आहे.. त्या विरोधात आवाज उडवलाच पाहिजे..

म्युन्सिपॅल्टीच्या मनमानीसंगे युद्ध आमचे सुरू
थुंकू किंवा मरू

या देशाचे अम्ही नागरिक
थुंकण्यामध्ये हो कसली आगळीक
रस्ते, जिने, भिंती ही रंगवू

हक्क आमुचा हो थुंकण्याचा
रस्ता आमुचा हो हक्काचा
घाण इतस्तत: करू

आजार पसरो कितीही भयंकर
टीबी निमोनिया अथवा संकर
थुंकी हक्कासाठी मरू

१४

**एक धागा सुखाचा**

https://youtu.be/6P0BLPvdxWI?feature=shared

(एअर इंडियाच्या विमानात एका खासदाराने केलेला तमाशा)

एक त्रागा फुकाचा
शंभर त्रागे हक्काचे
दाखविशी तू सुपर मानवा
हक्क तुझे एमपी चे

विमान उडता बसतो कोणी
कुणी इकॉनॉमी कुणी लक्झरी
दावी कोणी हात आडवा
तुजला तो नियमांचे -- एक त्रागा....

तुला न अडवी नियम कोणी
भय कायदा तुला न जरीही
पायदळी तुझे तुडविती
हक्क तुझे एमपी चे -- एक त्रागा...

दावी ताकद तूही अजूनी
सामान्य नच तू, राजकारणी
तुडवी उडवी परत तुला ते
विमान एअर इंडिया चे -- एक त्रागा...

१५

**काय बाई सांगू.. कशी गं सांगू**

https://youtu.be/OZfRBGocMdo?feature=shared

बहिणी बहिणी एकमेकांत स्पर्धा करत असतील तर जावा जावांमधे तर द्वंद्व युद्धच व्हायला हवं!

काय गं रंगू कशी गं रंगू
इच्यारते तुज का न वाटे लाज
असा कसला तुला आलाय माज

उगीच फुंकते कसली चूल
उगा उडवते नसता धूर
त्या धुळीचा त्या धुराचा
असला बाई होतोय तरास
असा कसला तुला आलाय माज

बरी लाजरी झालीस धीट
बघून कुनाला यील गं झीट

नखरे बघा या बाईचे नुस्ते
नटणं मुरडणं विसरून काज
असा कसला तुला आलाय माज

सहज बोलली वन्सं मी
माझ्यामधी का काय कमी
डोईवरती बसलीया चढूनी
जनू डोक्यावर हिच्याच हाये ताज
असा कसला हिला आलाय माज

१६.

**देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा..**

https://youtu.be/ALrZxOPx3DA?feature=shared

कांद्याची कचोरी खावी जेव्हा तेव्हा
भरपूर जेवा तुम्ही पोटभर खावा

हवी कचोरी सोबत साथ चटणीची
आहे इथे भरपूर नको, भीती वाटणीची
असा कसा खादाडांचा संयम तो तुटावा

पोटामध्ये लागे भूक न लावा तीस चाप
आहे ही कचोरी खास फर्स्टक्लास छाप
सुटूनि तोंडा पाणी खादाडां, चेव का सुटावा

आहे शुद्ध मराठदेशी ही ना परदेशी बिहारी
खवय्यांच्या पोटी काक, कोकलत विहारी
उदरस्थ त्या काकांना ही, कंठ का फुटावा

१७.

**रेशमाच्या रेघांनी..**

https://youtu.be/Qf02VW7lDXE?feature=shared

वडापाव म्हणजे महाराष्ट्रदेशाचा अभिमान..



एक मोठ्या कढईतून
उकळत्या तेलातून
बटाट्याचा वडा तळून काढिला
महाराष्ट्रदेशी मी एक नंबर लाडला..

रस्त्यावरी खवखव सुटे खायाची
कडेला रस्यावर ती गाडी लावायाची
वड्यासंगत चटणी पाव आणा जोडीला
महाराष्ट्रदेशी मी एक नंबर लाडला..

वडापावाची गाडी उभी तोऱ्यात
पाॅलिटिक्स जणू भरलंय सोऱ्यात
वड्यापावातून राजकारणी बघा काढिला
महाराष्ट्रदेशी मी एक नंबर लाडला..

टाकिले हो गाडे पहा वडापावाचे
गल्लोगल्ली देशी अभिमानी नावाचे
हाये हुश्शार तो किती बिल्कुल ना ढिला
महाराष्ट्रदेशी मी एक नंबर लाडला..

१८

**मारू बेडूक उडी गड्यांनो..**

https://youtu.be/regdDtSVf1g?feature=shared

करूया भानगडी मुलांनो, लफडी कुलंगडी
त्यावरीच तर विसंबू सारे, मारू उंच उडी

पैसे जमवा, न जुळवा ताळा
हवा तितुका करा रे गोळा
'काय चालले?' कुणी न बोले, कधी न मिळे तडी

समाजसेवा करावी कधी
तोंडी लावा विकास अधीमधी
आपण नसता इथे येईल ना तर जगबुडी

जमवा आता टपोरी पोरे
म्हणे अरे त्यास म्हणावं कारे
मिळेल ना मग तिकीट तुजला.. लावा लाडीगुडी

१९

**ससा तो कसा..**

https://youtu.be/D4qIWqLBCss?feature=shared

प्रामाणिकांना त्यांच्या प्रामाणिकतेचा वेगळाच गर्व असतो. ऑफिसातल्या अशाच एका प्रामाणिकाला वेळीच सावध करणार नाही तो मित्र कसला..

असा तू कसा
तू घेतलास वसा
तुला प्रामाणिकतेची नशा चढली
प्रामाणिक राहू
नि बिलकुल न खाऊ
ही शपथच रे कसली?

थोडे ही न खाऊ
नि प्रामाणिक राहू
असा कसा पण तू रे केला
हुशार तू असा
ऑफिसर कसा
कसा रे तू कामातून गेला
असली रे कसली बात

काय रे गंमत त्यात
खा की गड्या थोडे फार
सोड वसा..

हिरव्या हिरव्या नोटा
सोड कासेच्या लंगोटा
लाजेकाजेस्तव कशासी तू लाजशी
खाऊ गोड चारा अन
घेऊ कचेरी निवारा

दुजे काय आहे सांग आपल्याही पाशी
न ओशाळा उगा होशी
पाप धुण्या जाऊ काशी
सोड तो वसा..

येईल रिटायरमेंट
बघशील बँक बॅलंस
डोक्यावरी हात मारशील
असा कसा वाया
घालविला वेळ
बघ नंतर तू पस्तावशील
आता तरी सुधर जरा
वेळेवरीच तर बरा
सोड वसा..

२०

**बुगडी माझी सांडली गं..**

https://youtu.be/lSLMTR0tCZY?feature=shared

चटनी कशी सांडली रं खाता उत्तप्याला
खाता उत्तप्याला
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला
कुनी उडप्प्याला

माटुंग्यास हा अन्ना राहातो
उडप्याचे कसे हाटेल चालवितो
अन कप कप कापी पाजितो.. कापी पाजितो
अहो रोजच येतो घ्यून कॉफी गरम पाजायाला
गरम पाजायाला
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला
कुनी उडप्प्याला

सकाळ सकाळी अन्ना आला
हाटेलाच्या गल्ल्यावर येऊन बशिला
म्हने घालतो मी इडली डोशा खायाला
तर गरदी कशी जमली.. म्हनू काय त्या गरदीला
त्या गरदीला
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला
कुनी उडप्प्याला

उडुपीचा वाढपी तो तोबा तोबा
ए डोशाय इडल्ये उत्तपाये मारितो बोंबा
म्हनलं चला लौकर लौकर कोंबा
घाबरून घाईनं खायाला गेलो उत्तप्पा सांबाराला
उत्तप्पा सांबाराला
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला --- कुनी उडप्प्याला

चटनी म्या पहल्यांदा खाल्ली थोडी
मग त्यात म्या थोडा उत्तपा सोडी
लागली मला त्या चवीची गोडी
पन तिखट लई भारी म्हणून घेतला घोट सांबाराचा
घोट सांबाराचा
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला--- कुनी उडप्प्याला

व्हता उत्तप्पा लई ऊन ऊन
त्याला पाहून गेलो हरखून
लय भूक तर न खाल्ला जपून
ल्हान तोंडी घेतला घास मोठा.. आन घात झाला
आरं घात झाला
चटनी कशी सांडली रं, खाता उत्तप्प्याला
खाता उत्तप्प्याला
चुगली नका सांगू रं कुनी उडप्प्याला-- कुनी उडप्प्याला

२१.

**डाव मांडून भांडून मोडू नको**

https://youtu.be/IlAMmkVL-Bo?feature=shared

पक्षांतुराणांसाठी एक आर्जवी गीत..

पार्टी भांडून तंडून सोडू नको
पार्टी मोडू नको

चालले रे सर्व हे चांगले
उगा का ते असे खुंटीला टांगले
भुलून आमिषास असा दूर जाऊ नको

येता वरूनि आदेश रहा सारे उगे
आपुल्या मनिषेचे न उडवा फुगे
फुगे फुटण्या.. फोडण्याची वाट पाहू नको

जो तू आहेस तो पक्षे केले तुला
का रे मांडशी तरी वेगळ्याल्या चुला
सारे विसरूनिया उगा पक्ष फोडू नको

झाले नाव तुझे तू ते देखिले
का रे धावशी कुणी तुकडे जे फेकिले
तूच सोडूनिया लाज असा धावू नको

२२.

**तोच चंद्रमा नभात..**

https://youtu.be/0wyrc9M1prs?feature=shared



तोच चंद्रमा शिरावर मिऱ्या वाटे भामिनी
एकांत हवा कशास, कडाडे रोज दामिनी

आजही ती तशीच, कलत्र तेच चकणे
डोळ्यांनी रोखूनिया राग भरे देखणे
फणकारा राग तोच, तीच करवादिनी
एकांत हवा कशास, कडाडे रोज दामिनी

सारे तर ते तसेच, वागणे ही आडमुठे
हाती लाटणेही तेच, जिवावरी माझ्या उठे
अजूनी जाशी शिरात, तूच मूर्त दग्ध वाहिनी
एकांत हवा कशास, कडाडे रोज दामिनी

या मिऱ्या वाटण्याच्या आज दिसती खुणा
चंद्रमा तो टकलावरी, केस दिसतो उणा
स्वप्ने तुडविशी अशीच पायदळी गजगामिनी
एकांत हवा कशास, कडाडे रोज दामिनी

२३.

**येऊ कशी कशी मी नांदायला हो**

https://youtu.be/Mky6BHPYS0U?feature=shared

Important

मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.

नेहमीच करता असेच बाई
दूध जाई उतू लागलं सांडायला
येते कशी कशी मी भांडायला हो
येते कशी कशी मी भांडायला

रोजच असलं होतं सकाळी
एकाच हातानं हो वाजवता टाळी
लावू नका मस्का नाही मी भोळी
अहो नाही मी भोळी अशी गंडायला हो

चिडवता उगा का तुम्हास तोष
बाई मनी माझ्या साचलाय रोष
भांडायला मला आलाय जोश
तुम्हीच लावताय शांती भंगायला हो

येते कशी कशी मी भांडायला

ठाऊक हाए मला तुमचा कावा
तुम्ही कृस्णा नव्हे जो वाजविल पावा
अन वागता असं की न्हाई त्या गावा
मामला नाही हो थंडायला हो
येते कशी कशी मी भांडायला

आइकलं तुमचं सांगता जे का
असला कसला हो तुमचा हेका
दूध गेलं उतू, वाया गेला पैका
अवघड जातं मला नांदायला हो
येते कशी कशी मी भांडायला

२४.

**जाईन विचारीत रानफुलां**

https://youtu.be/KgM7JBmGt54?feature=shared

वर्गातील खोडकर मुलास वर्ग शिक्षिका..

देईन थोबाडीत दोन तुला
येशील लायनीत मग सरळ मुला

हैराण अगणित सारे ही जन
तू खोड्यांचे जणू नंदनवन
छडीचा मारच का कळतो तुला

तूच खोडकर दिसशी आननी
कुणी करावी त्यांची छाननी
तव मस्तीची न कशाशीच तुला

तुझी खोड्यांची ओढ अनावर
घालू न शकशी तू त्याला आवर
हाच एक तो पर्याय खुला

२५.

**आला आला पाऊस आला..**

https://youtu.be/AI2Z6O4oxyM?feature=shared

झाला झाला खाऊन झाला
बघा बघा हो खाऊन झाला
खाऊन झाला खाऊन झाला

काळ्या काळ्या पैशामधली
जादू पांढरी कुणी अनुभवली
अवती भवती बहरून आल्या समृद्धी माळा

जे जे खाती तेच शहाणे
इतरांचे ते फुका बहाणे
असला ताकदवान असे, न हिणवा तो काळा

प्रसन्नता पसरे घरदारी
या पैशांची किमया न्यारी
पकडले न जावे इतुकी, बस सावधानी पाळा

२६.

**एका तळ्यात होती बदके पिले सुरेख..**

https://youtu.be/rLnX8pOAPQ8?feature=shared

एका नळास होती तोटी अशीच एक
होती वाकुडी वेडी तोटी नळास एक

तोटी हवी कशास कोणीच काय सांगे
तोटी शिवाय होती इकडे उगाच दंगे
दावुनि बोट म्हणती तोटी शिवाय लोक
असो वेडी वा वाकुडी हवी नळास तोटी एक

तोटी शिवाय नळ ही कल्पना कशीशी
घेऊन भांडी निजती सारी जणे उशाशी
हवेच पाणी रोज, त्याविण रूतेल चाक
भरण्यास पाणी हवी ना तोटी नळास एक

एकेक करूनी त्यां सर्वांस ते कळाले
नसता नळास तोटी, पाणी तोंडचे पळाले
एकेक उठती निजेतून, करिती नळास चेक
उघडूनी पाहती तोटी, असे ना तोटी नळास एक

२७.

**आली बघ गाई गाई..**

https://youtu.be/RzhBI7BLmJY?feature=shared

मुंबईकर नोकरदारचे आयुष्य नि नशीब घड्याळयाच्या सेकंद काट्यावर चालणाऱ्या रेल्वेशी जोडल्याने घाई ही पाचवीला पुजलेली..

झाली बघ घाई घाई, गाडी आली स्टेशनात
फुललासे प्लॅटफाॅर्म, कसे घुसू मी डब्यात

झाली बघ घाई घाई, त्याचे काही न तंत्र ताळ
घुसताना गाडीमध्ये, सुटू नये माझा तोल

झाली बघ घाई घाई, क्षणभर उभी झाली
चढावे ते झटकन, नाहीतर राहू खाली

झाली बघ गाई गाई, चढतात तीत बाप्ये
पुण्यवंत चढूनी जाती, मागे राहती ज्यांची पापे

झाली बघ घाई घाई, साधावा तो असला मोका
जर उशीर पोहोचावया, साहेबाच्या नोकझोका



२८.

**टाळ बोले चिपळीला**

https://youtu.be/DkY-MY-TrNU?feature=shared

| Important |
| --- |
| मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा. |

आमच्या कॉलेजसमोरच्या सह्याद्री हॉटेलातली मिसळ परिसरातील 'जग'प्रसिद्ध मिसळ होती..

पाव बोले मिसळीला चाल माझ्या संगं
सह्याद्रीच्या हॉटेली जाऊ चल संग संग

खादाड हे सारे भुकेले ते राव
काही न सोडती, मारतील ताव

पावमिसळीसाठी पछाडती जंग जंग
सह्याद्रीच्या हॉटेली जाऊ चल संग संग

खादाड खाऊंची हौस पुरवावी
भुकेल्या साऱ्यांची भूक भागवावी
पोटभर खाऊ सारे चला बांधूनी चंग
सह्याद्रीच्या हॉटेली जाऊ चल संग संग

मिसळीत कांदा लिंबू एकरूप होई
आले सारे भुकेलेले ...सोडती ना काही
पावासंगे मारता ताव होती सारे असे दंग
सह्याद्रीच्या हॉटेली जाऊ चल संग संग

२९.

**धुंदीत गंधित होऊन सजणा..**

https://youtu.be/NhM-g1J5aaE?feature=shared

गुंगीत लुंगीत येऊनी चकण्या
झोपेत चालूनी येऊ या
ये चकण्या
झोपेत गुंगीत उठूनिया चकण्या
झोपेत भटकून येऊ या
ये चकण्या

डोळ्यात झोप तुझी उरे
तुजला न ऐशी पुरे
उठताच तू मिटल्या नयनांनी
कुणीही न म्हणते पुरे
झोप तुझी अशी कशी ही

व्यायामाचे वेड ते तुझे हे
सुटले न झोपेत तरी
निद्रेतही झटपटा चालणे हे
ही सवय न आहे बरी
सवय तुझी ही फार दिसाच

३०.

**नको आरती की नको पुष्पमाला..**

https://youtu.be/WxOFIydwKsE?feature=shared

नको आरती की कुणी अन्य बाला
(तिचा) बाप भोवताली असे टपलेला

कुणासि नको ते टाकणे दाणे
त्या बापाने पाहाता धाबे दणाणे
न उडवा पतंग, न लीला ना शीला

सदा सर्वकाळी सुकन्यां पाहातो
बाप सदा त्यांची चिंता वाहातो
नको अवतार अपुला कणीक तिंबलेला

शिक रे धडा हा स्वत: तूच बाळा
असो ऋतु कुठला, उन्हाळा हिवाळा
नको प्रेमरंग जेथ खेळ खल्लास झाला

३१.

**कौसल्येचा राम बाई..**

https://youtu.be/xXwJCl33uL8?feature=shared

आवडीचा जाम बाई आवडीचा जाम
संगती चहाचे पेले
आवडीचा जाम बाई आवडीचा जाम
भुकेल्या या खाण्यासाठी आला ब्रेडजाम

एक एक स्लाईस हाती जाम लावू त्यात
एक एक घास चघळू, वा! काय बात!
मिक्स फ्रूट जाम..
आवडीचा जाम बाई आवडीचा जाम

काय चव त्याची सांगू जाम हाच खास
एक एक घास तोंडी त्याची ही मिठास
मिक्स फ्रूट जाम..
आवडीचा जाम बाई आवडीचा जाम

स्लाईस मागे स्लाईस या संपती तमाम

ब्रेड जाम आवडतो सर्वांनाच जाम
खा सकाळ वा शाम..
आवडीचा जाम बाई आवडीचा जाम

हळू हळू खावा तो धरा रे तो धीर
परी न ऐकती, संपवती काही वेडे पीर

फटाफट खाती ब्रेड जाम
आवडीचा जाम बाई आवडीचा जाम

३२.

**खुलविते मेंदी माझा रंग गोरापान..**

https://youtu.be/boxlRThrwhY?feature=shared

एका शेंडीबहाद्दराचे गीत

खुलविते शेंडी माझं टक्कल गोरंपान
गोरं गोरं पान टक्कल, नाही त्यावर रान हो
खुलविते शेंडी माझं टक्कल गोरंपान

कसं रंग कसं रूप
बस करा रे तारीफ
टक्कल माझी शान, त्याचं करा गुणगान हो

आहे का हो पाहण्यात
असे कुठे हो जगात
कंगव्यावाचून हालते पान, हेच त्याचं गुणगान हो

शेंडी कैसी ऐसी जमी
टकलावरी काय कमी
चमकते किती छान, करा तिचं ही गुणगान हो

३३.

**काटा रूते कुणाला ..**



https://youtu.be/TeNAk_yYmjw?feature=shared

चामड्याची ॲलर्जी असलेल्या अनवाण्याचे गीत..

बाटा रूचो कुणाला   चप्पल घेतात कोणी
मज चामडे रूतावे   हा चर्मरोग आहे

सांगू कशा कुणाला   कळ लागता पायाशी
तो दाह चामड्याचा   डोक्यास ताप एक आहे

काही घेऊ पाहातो   वेळ व्यर्थ जात तेथे
माझे चप्पल शोधणे ते   सुमडीत होत आहे

ह्या शूज कंपन्यांची   चप्पलच का जमेना
ट्रायल करुन करूनी   मी रिक्तपाद आहे

३४.

**धुंद आज डोळे हवा धुंद झाली**

https://youtu.be/KZe0th2yLiQ?feature=shared

एका परीक्षार्थीचे गाणे

बंद आज डोळे हवा मंद झाली
नयनी माझ्या ही अशी नीज आली

किती अभ्यास तो.. त्या आधीच विश्रांती
कसा संपणार सारा, मला पडे भ्रांती
नवीनच सिलॅबस का यावे याच साली
अनुत्तीर्ण होता, माझा असे कोण वाली?

या अभ्यासाची का पडावी ऐसी बेडी
त्यात झोप असली मज तिच्याकडे ओढी
अशा पापण्या या माझ्या झुकतीच खाली
या निद्रेने असली का पंचाईत झाली..

इतक्या विषयांचा इतका पसारा
बघूनीच यावा मजला शहारा
होणार न सारे विषय, क्लियर या साली
की केटी पडावी या वर्षी माझ्या भाळी

३५.

**जांभूळ पिकल्या झाडाखाली..**

https://youtu.be/_mSs9-s5nOw?feature=shared

Important

मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.

निवडणुकांचा हंगाम नि पक्षांतराचा हंगामा..

दोन्ही एकाच वेळी होतंय..

यावा अमच्या झेंड्याखाली
विलेक्शन कोन लढतंय जी
लागंल ज्याचं पाय कुनाचं
पायगुनानं आमीच जिततंय जी

विलेक्शनचं वाहतं वारं
समदं आमच्याकडंच येती जी
आर्शेब्लीमंदी जान्यासाठी
पुरतं त्ये येडं झालं जी

मोडून आले जुन्या त्या पक्षा
होऊंदे जर बोभाटा झाला जी
येक येक शीट वाटूनी
आमचं पक्ष मजबूत झालं जी

येऊन आमच्या झेंड्याखाली
पोपटावानी त्ये बोलत जी
आयडॅलॉजीचं न अडलं घोडं
जिकून व्हईल ना मंत्री जी



३६.

**गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय?**

https://youtu.be/6T2pzhJqOMw?feature=shared

टॉमी नामक श्वानास आपला रक्षक म्हणून नेमू इच्छिणाऱ्या मालकाचे टॉमी बरोबरचे द्वंद्व गीत..

मालक:
टॉमी संगतीनं माझ्या तू येशील काय?
माझ्या बिल्डिंगची राखण तू करशील काय?
टॉमी:
आरं संगतीनं तुझ्या मी करणार काय?
मला चघळाया हाडूक तू देणार काय?

मालक:
रे तुझं भस्साडं नरडं, हॉर्न फिट्ट रे झालं
माझं कान की बसलं, त्यात दडं की आलं
ये की म्हणतो मी माझ्या संग जरा पोरा पोरा पोरा
टॉमी:
रं नगं दावूस असला तोरा.. तू तर चोरावरला रं मोरा
तुझ्या विनतीला अस्सा मी मानच देणार नाय..

टॉमी:
अरे मी टॉमी हैना.. मला हवी रं चैना
मला हाडं तू देईना.. मी घेतल्याबिगर जाईना
मालक:
रे तुला गळ्यात साखळी घालीन
रे तुला डॉग फूड रोज मी खिलवीन
टॉमी:
तुझ्या फसव्या या वचनांना असा मी भुलणार नाय

मालक:
टॉमी संगतीनं माझ्या तू येनार काय?
टॉमी:
आरं संगतीनं तुझ्या मी येणार.. हाय!

३७.

**केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर**

https://youtu.be/qvYEN10XTB8?feature=shared

पोलिसांच्या धाडीमध्ये वाचला रे चोर
पकडला त्यास तरी तुटला तो दोर

झटक्यात घुसले, बेचक्यात पकडले
अड्ड्यात त्याचिया पोलिस धडकले
पकडला त्यास अन मारला जणू ढोर

मुसक्या त्या बांधिल्या, कोठडीत डांबले
नको मारू बोंबा असे तोंडी बोळे कोंबले
उघडीच होती कोठडी, पोलिस विसावले
जोर लावी चोर असा, त्याने दोरखंड तोडले
चोर असा भांडखोर, जाहला शिरजोर

३८.

**फिरत्या चाकावरती देशी ..**

https://youtu.be/EeNd0JJbM-U?feature=shared

दिग्गज संगीतकार होऊन गेलेत, आता ही आहेत. पण काही कॉपीबहाद्दरांची कमाल पाहून तोंडात बोटे घालाविशी वाटतात..

उडत्या गाण्यालाही देशी असली तू चाल
च्यायला! तू कसला संगीतकार

शब्द बापुडे केवळ वारा
नको त्यात अर्थाचा पसारा
गाणे असले मग ये आकारा
तव गाण्याच्या चालींनाही नसे तंत्र ना ताल

दर गाण्याचे शब्द आगळे
हवे तयाचे संगीत वेगळे
तुला ते तर कळे ना कळे
मुखी कुणाच्या कोंबशी शब्द कुणी म्हणे भंगार

तूच बनविशी कॉपी करशी
कुठले संगीत कधी ऐकशी
गाण्यांची ऐशी बुंदी पाडीशी
देशी गाण्यांना परि देशी परदेशी आका

३९.

**केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा**

https://youtu.be/fa2SFPB0CTY?feature=shared

जिकडे पहावे तिकडे वातानुकूलन.. मग ते पर्यावरणास अनुकूल असो वा नसो..

जेधवा तेधवा
असे इकडे असा गारवा

तुझ्यासारखा तूच तेव्हा, गरमीचा जो वाटे भेवा
वेळोवेळी उष्म्यातूनी थंडविशी मानवा

चाले हा तर सगळ्यांसाठी, पंख्यांसह तो खिडकीपाठी
वातानुकूलन असले करीशी, आणिशी गारवा

आपुल्या आपुल्या स्वार्थासाठी, आणिला तो थंडावा पाठी
प्रश्न न पडला वा ॅर्मिंगचा, ग्लोबली ना पर्वा

४०.

**आज कुणीतरी यावे**

https://youtu.be/3WrwJTgUw5Y?feature=shared

फास्ट फूडच्या जमान्यात सारेच फास्ट.. अगदी वजन वाढ देखील

आज काहीतरी खावे
पटकन पोटी जावे

शिजे पटापट ते अग्निवर
वेळ न लागो त्यास भयंकर
तसेच त्याला खावे

शिजवल्याविण खाऊ मिळावा
घरबसल्या कुणी देऊन जावा
इन्स्टंट काही मिळावे

सारे असले फास्टच खाती
सैंपाकाची गरजच सरती
सर्वांनी लठ्ठच व्हावे..

४१.

**शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती..**

https://youtu.be/RK39PjU6e-8?feature=shared

चोर आम्ही सरदार आम्हाला नाही नीती अनीती
डाका, दरोडा अन पैशापायी दात ओठ ही खाती

चोरीच्या तंत्रात पटाईत कुणासही करू चीत
हाती कट्टा, सुरा न बंदूक, नाही तुरूंगा भीत
काम नको आम्हास काही, चोरी हीच प्रीती

घुसावं अन लुटूनच न्यावं हेच आम्हाला ठावं
अमुच्या या 'शौर्या'चं गीत, भीत भीत कुणी गावं
चोरीपायी भटकू कुठेही, समुद्रापल्याडही साती

४२.

**जनता जेथे राज्य करी..**

https://youtu.be/i_hUwLiwkAY?feature=shared

आम्हीच शासक आम्हीच मालक जनता येथे सेवेकरी
आम्हीच प्यारे आम्हीच सारे सत्तेच्या मंदिरी

बाब न ही ती नवी नवेली,
सोडली मागे कधीच झोपडी
झूल पांघरून आम्ही राहतो,
जनता सांभाळते चोपडी
धनिक ही आम्ही, वणिक ही आम्ही, जनता येथे काय करी?

प्रत्येकाच्या गतकर्माने,
ज्याचा त्याला मान लाभतो
आमुची कर्मे असता असली,
जनसामान्य उपाशी असा राहतो
आम्ही न उपाशी, आम्हीच अधाशी, आम्हा दिसे ना कुणी भिकारी

आमुचे ते दर्शन घ्याया
व्हावी लाचार जनता ही कशी रे
जनतेला ही खुश कराया
इलेक्शनीचे वाहती वारे
आम्हीच साधू, संधीसाधू, खुर्चीचे हे आम्ही जुळारी

४३.

**तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं**

https://youtu.be/AONwrJRCt7A?feature=shared

माज्या या जिन्दगीला आनि काय हवं

माज्या या मद्दारांना प्रतिनिधी नवं

नव्या आमदारानं काय नवीन घडंल

आमदारकीसंग लाल दिवा बी येईल

मतं येतील लई येतील

भोग सरंल सीट येईल

वरसांची कळा जाई बदलुनी

मंत्रीपदाची आस उमले त्यातुनी

अरं त्या भाऊसाह्येबाला पाजीन मी पानी

मग काय म्हनेल तो.. फिरंल गात गानी

ठाऊक आहे मला कुठं फिरवावी कळ

माज्या या विच्छेला हाए दिल्लीचं रं बळ

जिंकेल बहुमतानी म्या, आमदार बनंल म्या

राजावानी फिरवील, जन्तेला बी खेळवील

दिल्लीवाल्याना बी सुखविल म्या
व्हईन मी मंत्री कुनी, वट माजीच रं जमेल
माज्या लाल दिव्याचा त्यो वारसा असंल

गाववाल्यांनो हिर तीच बदला रहाट
माज्या या गावासाठी नवी यील पहाट
म्या यीन राजावानी हितं राज्य यील माझं
नगा करू काळजी म्यां वढीन हे ओझं
ह्या समद्या गावकीचा म्याच बनीन जीव
गावाचं भलं बुरं बस मलाच रं ठाव
मतं येतील लई येतील
भोग सरंल सीट येईल

४४.

**कधी दूर दूर कधी तू समोर..**

https://youtu.be/Gtpc5bCnR88?feature=shared

मूळ द्वंद्व गीतातला रोमान्स नि रोमांच संपलाय.. आता फक्त द्वंद्व उरलेय.. नि हे गीत आता त्याचे सोलो झालेय..

कधी टुर टुर कधी तू चकार मज ऐकवते रोज का
का हे असे, का ते तसे, हा धोशा लाविसी का
कसा आवरू सावरू मी स्वत:
दिसशी स्वप्नातही जागतानाही मला
छळवाद हा छळवाद हा
कळतो मला

क्षणभरातही सारी कशी चुणूक दाखवून जाती
असशी दूर तरी वाटे जवळी, वाटे अशीच भीती
तू छद्मी हासते, अशी वागते, पुन्हा पुन्हा आठवते
मग डोळे मिटून बसतो, पाहतो, असे
च भय वाटते

तू असल्याचा का असा खेळ हा
दिसशी स्वप्नातही जागतानाही मला
छळवाद हा छळवाद हा..
कळतो मला..

नाही कुठल्या शंका उरल्या तुला जाणून गे
अशीच होतीस ना, तशी नव्हतीस तू ना तशी गे
तू अशी बस ना, हळूच बोलना.. शांत हवी मला तू
पण ठाऊक आहे मलाही तू आता तशी नसशी तू
तुझे ढंग सारे, न रंग वाटे ही नवा

दिसशी स्वप्नातही जागतानाही मला
छळवाद हा छळवाद हा..
कळतो मला.



४५.

**असावा सुंदर चॉकलेटचा बंगला..**

https://youtu.be/SaDZjaXpWq8?feature=shared

Important

मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.

निरागसतेने गाण्याच्या वयातून बाहेर पडून 'मोठे' झाल्यानंतरचं गाणं..

असावा सुंदर खरोखरचा बंगला
एक वा दुमजली मोठ्ठाला चांगला

खरोखरच्या बंगल्याला मोठ्ठालं दार
घुसणंही आतमध्ये कठीण होईल फार

गोल गोल जिने अन मजले दोन
राखणीला बंगल्याची फिरती ड्रोन

प्रशस्त गच्चीवर बाग छानदार
हिरवळ, वाटा नि झोपाळे चार

बंगल्याच्या गेटपाशी सिक्युरिटी राहतो
नाव गाव लिहिल्यावाचून कुणास ना सोडतो

रूपये पैसे मोजण्याचा खेळ रंगला
काळा की पांढरा कायदा वर टांगला

कित्ती कित्ती मोठा हा खराखुरा बंगला
हवा अजून तीन मजली मोठ्ठाला चांगला

४६.

**शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा..**

https://youtu.be/RRbiZ4fwJ5g?feature=shared

कालौघात शेपूट गळालं माणसाचं. तसा पाठीचा कणा अजून दहा टक्क्यांत शाबूत आहे. तो तसा अभिमानाने मिरवावा अशी बाब नाही. नाइलाजाने वापरावा लागतोय.. गळण्याची वाट पाहात!

कणेवाल्या माणसांची पूर्वी भरली सभा
एक होता सभापती मधोमध वाकून उभा

पहिला म्हणाला, मित्रांनो,
ही न देवाघरची लूट, न देवाघरची लूट
आहे कणा काय करता मिळणार नाही सूट!
या कण्याचे कराल काय?

दुसरी म्हणाली, अश्शी, अश्शी, गुंडाळेन गाशा

तिसरा म्हणाला, ध्यानात धरीन, ध्यानात धरीन
मी माझ्या कण्याने असेच करीन, असेच करीन

चौथा म्हणाला, शक्य होईल तेव्हा कणा वाकवीत राहिन

पाचवी म्हणाली, होय गं बाई, चौथ्यासारखंच बर्रं गं बाई

शक्य तितका कणा वाकवीन, मी कणा वाकवीन

सहावी म्हणाली, मारेन उडी अन कण्याची मी घालेन घडी

सातवा म्हणाला, कधी ताठ कधी वाक.. येऊ दे त्याला खुश्शाल बाक

आठवा म्हणाला, कणा म्हणजे काय बात! काय बात
त्या वाचून पोहत रहा प्रवाहात..

नववा म्हणाला, माझे काय?

तुझे काय? हा! हा! हा!
कणा म्हणजे.. ताठ बाणा..

दहावा म्हणाला, कणा असा ताठ, मी धरीन, मी धरीन
अन वाटल्यास डूख मी धरीन
डूख मी धरीन..

पहिला म्हणाला, छान छान
या असल्या कण्याचा ठेवा मान
शक्यतो कण्याचा उपयोग करा

नाहीतर काय होईल?
बाकी नव्वद टक्क्यांगत कणा आपला गळून जाईल..

४७.

**तुला पाहते रे.. तुला पाहते..**

https://youtu.be/Vypzy0sLFEI?feature=shared

अर्थातच प्रत्येक पत्नीधर्मास जागणाऱ्या पत्नीचे गीत..
तुला बघते रे तुला बघते
जरी दृष्टीआड तुला बघते
तुला बघते रे तुला बघते
ठेविन धाकात मुठी वाळते रे

लक्ष ठेवण्याचा जिवा ध्यास लागे
तू झोपला तरी रहावे मी जागे
चुकांकडे तुझ्या मी ध्यान ठेवते रे

किती भाग्य थोर माझ्या भेटीचेही
किती रे अपूर्ण तू माझ्या विना ही
तुझ्या परफेक्शनचे स्वप्न मी पाहते रे

कधी सोडेन का तुला एकट्याला
अशी रिस्क का मी घ्यावी कशाला
पकडूनि लगामा मुठी वाळते रे

४८.

**कर हा करि धरिला शुभांगी**

https://youtu.be/zpy0KR1aayg?feature=shared

Important

मूळ गाणे ऐकण्यासाठी निळ्या रंगातील यू ट्यूब लिंक वर क्लिक करा.

बालविवाह करणाऱ्या नरपुंगवाचे गाणे..


पोर परकरी धरिली वामांगी
या दिनी उभा पोलिसां सामोरी


पकडा सदा कारा गामी तू
बंदीगृही सजा भोगिसी सारी


डॉ. नितीन मोरे यांची ५४+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.














डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास





डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे







डॉ. नितीन मोरे



एका डॉक्टरची कोविडकथा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.







डॉ. नितीन मोरे
मुघले ते थोले
Version 2.0.2.0


HOSTEL-I

डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!

डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी



डॉ. नितीन मोरे








डॉ. नितीन मोरे
सबू
आणि
दाबू





डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे


आधुनिक कहाण्या




डॉ. नितीन मोरे
घरात

डॉ. नितीन मोरे

सांगतो ऐका

केल्याने

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

## डॉ. नितीन मोरे यांचे हे चौपन्नावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५४पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१४), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३७), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (१०), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)